पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८, सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/०३/कावि/१२४/२०२५
दिनांक : १३/०२/२०२५

विषय :- 'लघुलेखक (निम्नस्तर)' पदोन्नती बाबत...

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील 'लघुलेखक (निम्नस्तर)' अभिनामाचे पद पदोन्नतीने भरण्याकरीता खालील नमुद पदोन्नतीचे निकष पुर्ण करण्या-या आस्थापनेवरील वर्ग ३ मध्ये कार्यरत कर्मचा-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सेवा प्रवेश नियमातील पदे भरण्याची तरतूद -**

महाराष्ट्र शासन राजपत्र, दि.१८ फेब्रुवारी २०२० अधिसूचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम, २०२०

| नेमणूकीची पध्दत | नेमणुकी करीता आवश्यक अर्हता | पदोन्नतीने भरावयाची रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|
| **नामनिर्देशन / सरळसेवा ७५%** | १. मान्यता प्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेच्या पदवी आवश्यक.<br>२. मराठी/ इंग्रजी लघुलेखनाचा वेग किमान १२० शब्द प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. आणि इंग्रजी वेग ४० श.प्र.मि. (तत्संबधी शासकीय परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र आवश्यक).<br>३. महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण किंवा D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C. किंवा O स्तर किंवा A स्तर किंवा B स्तर किंवा C स्तर पैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.<br>४. मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. | - |
| **पदोन्नती २५%** | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील वर्ग ३ च्या कर्मचा-यांतील उपरोक्त अर्हता धारण करणा-या व लघुलेखनाचा अनुभव असणा-या, किमान ३ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचा-यांची सेवाज्येष्ठता व गुणवत्तेच्या आधारे पदोन्नती. | ३ |

उपरोक्त प्रमाणे 'लघुलेखक (निम्नस्तर)' पदोन्नती करीता आवश्यक निकष/अर्हता पुर्ण करणा-या आस्थापनेवरील पात्र कर्मचा-यांनी सोबतचे विहीत नमुन्यामध्ये विभागप्रमुखांमार्फत दिनांक २८ /०२/२०२५ अखेर सामान्य प्रशासन विभागाकडे अर्ज सादर करावेत. अर्जासोबत पदोन्नतीकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, मनपा सेवेत नेमणुक नियमित झालेच्या आदेशाची प्रत सादर करावी. मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

सदरचे पत्र आस्थापनेवरील सर्व संबंधित कर्मचा-यांचे निदर्शनास आणून देवून त्याची पोहोच सामान्य प्रशासन विभागाकडे सादर करावी.

**(विठ्ठल जोशी)**
**उप आयुक्त,**
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

**सोबत -**

कामकाज अहवाल, विहित नमुन्यातील अर्ज यांचे नमुने

प्रति - सर्व विभागप्रमुख,

२/- प्रस्तुतचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अर्हताधारक कर्मचा-यांचे निदर्शनास आणून दयावे व त्याबाबत त्यांची पोहोच घेण्यात यावी. सदरचे पत्र निदर्शनास आणून दिले नाही, म्हणुन अर्ज करता आला नाही, अशा प्रकारच्या कर्मचा-यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यास संबंधित विभागप्रमुख जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

**कामकाज अहवाल**
**(सन २०१९-२० ते सन २०२३-२४ या कालावधीतील)**

१ कर्मचा-यांचे संपूर्ण नांव -

२ पदनाम -

३ विभाग -

४ जात व जातीचा प्रवर्ग -

५ कर्मचा-याची शैक्षणिक अर्हता -

६ सध्याच्या पदावरील सेवाजेष्ठता क्रमांक -

७ महापालिका सेवेत वेतनश्रेणीत रूजू दिनांक -

८ महापालिकेत झालेली एकुण सेवा -

९ मागील ५ वर्षात दंड अथवा अन्य शास्ती - झाली असल्यास त्याबाबतचा तपशिल (सन २०१९-२०२० ते २०२३-२०२४ वर्ष निहाय)

१० मागील ५ वर्षातील कामावरील विनापरवाना गैरहजेरीचा तपशील - (सन २०१९-२०२० ते २०२३-२०२४ वर्ष निहाय)

११ खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित असल्यास त्याबाबतचा तपशील -

१२ कामकाज अहवाल -

| २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ |
|---|---|---|---|---|
| | | | | |

१३ पदोन्नतीसाठी पात्रता - आहे/नाही

१४ पदोन्नतीसाठी पात्रता नसल्यास - त्याबाबत संयुक्तीक कारणांसह अहवाल

विभागाचे नाव -

जावक क्रमांक -

दिनांक - /०२/२०२५

विभागप्रमुखाची स्वाक्षरी व शिक्का
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग.

प्रति,

मा.उप आयुक्त

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी -४११०१८

**विषय - 'लघुलेखक (निम्नस्तर)' पदासाठी अर्ज.**

संदर्भ - परिपत्रक क्र.प्रशा/३/कावि/ /२०२५, दिनांक- /०२/२०२५

महोदय,

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाद्वारे कळविलेनुसार मी **'लघुलेखक (निम्नस्तर)'** पदासाठी आवश्यक असलेली पदोन्नतीची अर्हता धारण करीत असून विषयांकित प्रकरणी माझी खालीलप्रमाणे माहिती सादर करीत आहे. व शैक्षणिक अर्हता व इतर कागदपत्रे सोबत देत आहे.

१ संपूर्ण नांव व संगणक क्रमांक -

२ विभागाचे नांव

३ सध्याचे पदनाम -

४ मनपा सेवेत वेतनश्रेणीत रूजू दिनांक -

५ मनपा सेवेत नियुक्ती नियमित आहे/नाही (आदेश क्र/ दिनांक)

६ जात व जातीचा प्रवर्ग -

७ जात वैधता प्रमाणपत्र आहे/नाही.
(असल्यास जातवैधता प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक) -

८ कार्यरत पदावरील सेवाजेष्ठता क्रमांक -

९ शैक्षणिक अर्हता -

कर्मचारी स्वाक्षरी -

नाव, पदनाम -

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त,
सामान्य प्रशासन विभाग.